पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण.
( आस्थापना शाखा )
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर अळी, पोलीस स्कुल समोर,
ठाणे ग्रामीण-४००६०१
E-mail id-sp.thane.r@mahapolice.gov.in/sheetbranch.thane.r@mahapolice.gov.in
Fax NO .022-25304873 Phone No 022-2534278/2530488

जा.क्र.पोअ/ठाग्रा/पोशि भरती-२०२२-२३/मुळ का.पडताळणी/ २८८ /२०२४ दिनांक-२८/०८/२०२४

# ठाणे ग्रामीण पोलीस शिपाई भरती-२०२२-२०२३
## उमेदवारांना सुचना
### पोलीस शिपाई तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) मधील उमेदवारांना मुळ कागदपत्राकरीता उपस्थित राहणेबाबत सुचना

१. पोलीस शिपाई पदाच्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) व तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी (Provisional Waiting List) ही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी व भरती निकषाची पुर्तता यांच्या अधीन राहुन तयार करण्यात आली असुन दि.२२/०८/२०२४ रोजी घटकाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) मधील उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सुक्ष्म पडताळणीसाठी व सदर कागदपत्रांचा सत्यप्रत केलेला छायांकित प्रतीचा दोन वेगवेगळे संच तसेच ०४ पासपोर्ट साईज फोटो घेवुन खालील दर्शविल्याप्रमाणे वित्तक हॉल, ठाणे ग्रामीण पोलीस मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहरचे शेजारी, ठाणे पश्चिम येथे शनिवार दि.३१/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता बिनचुकपणे हजर राहावयाचे आहे.

| अ.क्र. | पोलीस शिपाई तात्पुरत्या निवड यादी मधील उमेदवार संख्या | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | ७३ | दि.३१/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता |

### सोबत आणावयाच्या कागदपत्रांचा तपशिल- मुळ कागदपत्रे व छायांकित २ प्रती व ४ फोटो -

उमेदवाराने मैदानी चाचणीचे ऑनलाईन प्रवेशपत्र (या कार्यालयाने शिक्का मारुन दिलेले) व लेखी परिक्षेच्या वेळी ऑनलाईन काढलेले ओळखपत्र सोबत न चुकता आणावे.

| | |
|---|---|
| १. | १० व १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्रे |
| २ | उच्च शिक्षीत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्रे |
| ३ | जात प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र |
| ४ | नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (अ.जा., अ.ज., इडब्युएस व खुल्या प्रर्वगातील उमेदवार वगळुन) |
| ५ | इडब्ल्युएस प्रमाणपत्र. |
| ६ | एसईबीसी प्रमाणपत्र |
| ७ | आवेदन अर्जात नमुद केलेले समांतर आरक्षणाबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे व सर्व वैध |

| | |
|---|---|
| | कागदपत्रे / प्रमाणपत्र (खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पोलीस पाल्य, अंशकालीन, होमगार्ड, माजी सैनिक / युध्दात अपंग झालेल्या किंवा मृत झालेले सैन्यातील व्यक्तीचे कुंटुंब) |
| ८ | अधिवास प्रमाणपत्र (Domicile) |
| ९ | जन्म तारखेबाबतचे प्रमाणपत्र ( जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) |
| १० | संगणक अर्हता प्रमाणपत्र (असल्यास) |
| ११ | आधारकार्ड/पॅनकार्ड/महाविद्यालयाचे ओळखपत्र |
| १२ | आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य प्रमाणपत्र |
| १३ | उमेदवार शासकिय सेवेत अथवा निमशासकीय सेवेत नोकरीस असल्यास त्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र. |
| १४ | व इतर आवश्यक कागदपत्रे. |

३. सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional Selection List) असेल. निवड यादीमध्ये नावांचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवु नये.

४. ज्या उमेदवारांनी आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गात आवेदन अर्ज करुन त्यांचा निवड यादीत समावेश झालेला आहे, त्यांचेबाबतीत मुळ कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहुन मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती २०२२-२३ /१७३/२०२३/९६६ दि.१६/०७/२०२४ व पत्र क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती २०२२-२३/१७३/ २०२३/१०४० दि.३०/०७/२०२४ तसेच क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती २०२२-२३/१७३/२०२३/ १२०० दि.२३/०८/२०२४ अन्वये दिलेल्या सुचनांप्रमाणे पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

५. तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) मधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे ही विहीत शासन निर्णय, परिपत्रके व पोलीस भरती कार्यपध्दतीमधील निर्देशानुसार फेर पडताळणी झाल्यानंतर अंतिम निवड यादी (Final Selection List) तयार करण्यात येणार आहे.

६. तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) व तात्पुरती प्रतिक्षा यादी (Provisional Waiting List) मधील निवड ही भरती निकषांची पुर्तता यांच्या अधीन असल्याने त्यामध्ये उमेदवार अपात्र झाल्यास त्यांचे नाव रद्द करण्यात येईल. याबाबत उमेदवारांचा कोणताही दावा/तक्रार/हक्क राहणार यांची नोंद घ्यावी.

७. कागदपत्र पडताळणीच्या वेळी मुळ कागदपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र करण्यात येईल.

८. कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवार गैरहजर राहील्यास त्यांचे नाव तात्पुरत्या निवड यादीतुन वगळण्यात येईल.

९. पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

२८/८/२४

( डॉ.डी.एस.स्वामी )
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तथा
पोलीस भरती अध्यक्ष, ठाणे ग्रामीण